पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.१९.०४.२०२३

आलोसे क्रं. १)विनोद उत्तम पवार, वय–३२, सिनिअर टेक्नेशिअन, म.रा.वि.वि.कं.मर्या फत्तेपुर ता.जामनेर ह.मु.फत्तेपुर ता.जामनेर मुळ रा.पठार तांडा ता.जामनेर जि.जळगांव व आरोपी क्र.२ कलीम सलीम तडवी, वय–२७, व्यवसाय मजुरी रा. देऊळगांव गुजरी ता.जामनेर जि.जळगांव **(खाजगी इसम)** यांनी १५००/– रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.१ यांनी स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | पहुर पो.स्टे. गु.र.नं.१०७/२०२३ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ व ७ अ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | आलोसे क्र.१ विनोद उत्तम पवार, वय–३२, सिनिअर टेक्नेशिअन, म.रा.वि.वि.कं. मर्या फत्तेपुर ता.जामनेर ह.मु. फत्तेपुर ता.जामनेर मुळ रा.पठार तांडा ता.जामनेर जि. जळगांव **( विज वितरण वर्ग ३)**<br>आरोपी क्र.२ कलीम सलीम तडवी, वय–२७, व्यवसाय मजुरी रा. देऊळगांव गुजरी ता.जामनेर जि.जळगांव **(खाजगी इसम)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१९/०४/२०२३ रोजी<br>१५००/–रु.लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | १५००/– रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१९/०४/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी यांचे वडीलांचे ताब्यात ग्रामपंचायत तोरनाळा ता.जामनेर येथे गावठाण बखळ जागा आहे. सदर बखळ जागेवर फिर्यादी यांनी पत्री शेड उभारले असुन, सदर ठिकाणी त्यांना नविन विज कनेक्शन घ्यावयाचे होते. म्हणुन त्यांनी आलोसे क्र.१ वायरमन पवार व त्यांचे सोबत काम करणारे आरोपी क्र.२ कलीम तडवी खाजगी वायरमन यांना फोन लाउन नविन विज कनेक्शन घेण्यासाठी कोणते कागदपत्र लागतील या बाबत विचारणा केली. त्यावेळी आरोपी क्र. २ यांनी फिर्यादी यांना आधारकार्ड,ग्रमपंचायतचा नाहरकत दाखला, १०० रु चा स्टॅप पेपर व डिमांड नोट भरण्यासाठी लागणारी रकमे बाबत सांगीतले होते.त्यानंतर फिर्यादी हे दि.१०.०४.२०२३ रोजी नविन विज कनेक्शन घेण्यासाठी लागणारे संपुर्ण कागदपत्र घेउन एम.एस.ई.बी. कार्यालय फत्तेपुर येथे गेले होते. तेथे फिर्यादी यांना आलोसे क्र. १ व आरोपी क्र. २ हे दिसुन न आल्याने त्यांनी आरोपी क्र. २ यांना फोन लाउन विचारणा केली. त्यावर त्यांनी फिर्यादीस मी तुम्हाला तोरनाळा येथे येउन भेटतो असे सांगीतले. त्या प्रमाणे आरोपी क्र. २ यांनी फिर्यादी यांची तोरनाळा येथे जाउन भेट घेतली व फिर्यादी कडील कागदपत्र घेउन डिमांड नोटसाठी २,०००/– रु व साहेबांसाठी १,५००/– रु असे एकुण ३,५००/– रु लागतील असे सांगुन फिर्यादी कडुन २,०००/– रु घेतले. व उर्वरित रक्कम डिमांड नोट भरल्यानंतर द्यावे लागतील असे सांगीतले. त्यानंतर दि.१८.०४.२०२३ रोजी फिर्यादी यांना आलोसे क्र. १ यांनी फोन करुन फोनवर तुमचे कागदपत्र व २,०००/– रु मला मिळाले असुन तुमचे डिमांड नोटचे काम झालेले आहे, तुम्ही उर्वरित १,५००/– रु घेउन या व डिमांड नोट घेउन जा असे सांगीतले. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दि.१९.०४.२०२३ रोजी पडताळणी केली असता आलोसे क्र.१ व आरोपी क्र. २ यांनी फिर्यादी यांचे वडीलांचे नावे असलेल्या बखळ जागेवर नविन विज कनेक्शनची जोडणी करुन देण्याचे मोबदल्यात शासकिय फि व्यतिरिक्त प्रथम २,०००/–रुपये लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती १,५००/– रु लाच रक्कम आलोसे क्र. १ यांनी स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in
**टोल फ्री क्रमांक:–** 1064,दुरध्वनी **क्रमांक:–**0257-2235477
**व्हॉटस्अॅप क्रमांक:–** 8766412529

19.4.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव